घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल शुध्द तूप
फोन नं.(०२५६२) २३८६६१ navalgheedhule@gmail.com सर्वत्र उपलब्ध

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

Post Regd.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.२०० ■ गुरुवार २५ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

मुंबई चष्माघर
आग्रारोड, धुळे.
☎-235222,मो.9021853108

# भाजपने बावीस अब्जाधीश तयार केले! आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार

**अमरावती, दि.२४– स्वातंत्र्यानंतर भारताच्या इतिहास पहिल्यांदाच संविधानावर आक्रमण होत असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. भाजपने बावीस अब्जाधीश तयार केले आहेत. तर आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला. महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी महिलांच्या खात्यात दरमहा ८ हजार ५०० रुपये म्हणजेच एका वर्षात एक लाख रुपये दिले जातील. यातून कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याची घोषणा राहुल गांधी यांनी जाहिर सभेतून केली.**

अमरावती लोकसभा मतदारसंघातील महाआघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी राहुल गांधी बोलत होते.

एकीकडे महाविकास आघाडी इंडिया आघाडी संविधानाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय संविधान हिंदुस्तानचा आवाज आहे. हे संविधान कोणीही बदलू शकत नाही. जगातील कोणतीही शक्ती संविधान बदलू शकत नाही. संविधान बदलण्याची कोणाची हिम्मत आहे, ते आम्ही पाहतो, असा इशारा देखील राहुल गांधी यांनी दिला आहे.

**श्रीमंतांचे कर्ज माफ**

भारतातील शेतकरी, गरीब, बेरोजगार युवा, महिला यांचे एक रुपयाचे देखील कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले नाही. तर श्रीमंतांचे सोळा लाख कोटी रुपयांचे कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. १६ लाख कोटी रुपये म्हणजे मनरेगाचे पंचवीस वर्षाचे बजेट असल्याचा देखील आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. म्हणजेच पंचवीस वर्षांचा (पान ४ वर)

अमरावतीतील सभेत राहुल गांधींची ग्वाही



## नवापूर पो.स्टेशनचे पीआय वारे यांना लाच घेतांना पकडले

नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)– नवापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना पन्नास हजार रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान, पीआय वारे यांच्याविरोधात एसीबीने कारवाई केल्याची वार्ता गावात पसरताच मोठा जमाव पोलीस ठाण्यावर चालून आला. या जमावाने वारे यांना तात्काळ अटक करण्याते मागणी करीत पोलीसांच्या वाहनावर दगडफेक केल्याने परिसरात तणाव पसरला होता. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एका तक्रारीनुसार पीआय वारे यांना (पान ४ वर)

## निवडणूक आयोगाकडून मोदींच्या भाषणाची चौकशी सुरु द्वेषपूर्ण वक्तव्यांबाबत काँग्रेस, माकपाच्या तक्रारीची दखल

**नवी दिल्ली, दि.२४– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांसवाडा येथे दिलेल्या वक्तव्याची निवडणूक आयोगाने चौकशी सुरू केली आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास लोकांच्या मालमत्तेचे मुस्लिमांमध्ये वाटप करेल, असे पीएम मोदी राजस्थानमधील बांसवाडा येथे म्हणाले होते. पंतप्रधानांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या टिप्पणीचाही उल्लेख केला होता, ज्यात त्यांनी म्हटले होते की देशाच्या संसाधनांवर अल्पसंख्यांकांचा पहिला हक्क आहे.**

पंतप्रधानांच्या या विधानाविरोधात काँग्रेस आणि माकपने निवडणूक आयोगाकडे स्वतंत्र तक्रारी केल्या होत्या. संपत्तीच्या वितरणाबाबत पंतप्रधान मोदींच्या विधानावर कारवाई करावी, अशी विनंती काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली होती. काँग्रेसने या विधानाचे वर्णन फूट पाडणारे, दुर्भावनापूर्ण आणि विशिष्ट समुदायाला लक्ष्य करणारे असे केले होते. त्याचवेळी सीपीआय (एम) चे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनीही एका पोस्टमध्ये निवडणूक आयोगाला या तक्रारीकडे लक्ष देऊन पंतप्रधान मोदी आणि भाजपवर कारवाई करण्याचे आवाहन केले होते. याप्रकरणी एफआयआर नोंदवण्याची मागणी त्यांनी केली होती.

रविवारी राजस्थानमधील बांसवाडा येथे पीएम मोदी म्हणाले, कि, काँग्रेसचे सरकार आल्यास प्रत्येकाच्या मालमत्तेचे सर्वेक्षण केले जाईल. आमच्या बहिणींकडे किती सोने आहे याचा तपास करतील. चांदीचा हिशेब घेतला जाईल. माझ्या माता-भगिनींच्या आयुष्यात सोने हे केवळ दिखाव्यासाठी नाही. हे त्यांच्या स्वाभिमानाशी संबंधित आहे. त्यांचे मंगळसूत्र हा सोन्याच्या किमतीचा मुद्दा नाही, तो त्यांच्या आयुष्यातील स्वप्नांशी निगडित आहे, ते हिसकावण्याचे तुम्ही तुमच्या जाहीरनाम्यात बोलत आहात. यापूर्वी त्यांचे सरकार सत्तेवर असताना त्यांनी देशाच्या मालमत्तेवर (पान ४ वर)



# नंदुरबारमध्ये बहुजन मुक्ती पार्टीचे वळवी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी) – बहुजन मुक्ती पार्टीचे उमेदवार आर.जी. वळवी यांनी आज नंदुरबार लोकसभा मतदार संघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.**

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरापासून बैलगाडीवर शक्तिप्रदर्शन करत रॅली काढण्यात आली. ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आली येथे बहुजन मुक्ती पार्टीचे उमेदवार आर.जी. वळवी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेली. यानंतर बहुजन मुक्ती पार्टीचे पदाधिकारी व आपल्या कार्यकर्ते सह वळवी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

## अक्कलकुव्यात विजचोरी दोघांवर गुन्हा दाखल

नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)– तळोदा येथील साई इकवा मिनरल प्लांट च्या मालकाने बारा महिने वीज चोरी केल्याने २ लाख ८१ हजार ९६० रुपये येणे बाकी असल्याने अमोल विश्वनाथ हिवरे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ हजार ५०९ वीज युनिट चोरी केल्याची बाब चौकशी अंती निदर्शनास आली आहे. त्यांनी रक्कम न भरल्याने बी.आर. मानवटकर यांनी फिर्याद दिली असून २३ एप्रिल रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पोहेकॉ संजय जाधव यांच्याकडे तपास देण्यात आला आहे. तसेच अक्कलकुवा गावात सहारा (पान ४ वर)

# ग्राहकांकडून अतिरिक्त वीज शुल्क आकारणी करता येणार नाही

ग्राहक आयोगाचा निर्वाळा

**धुळे, दि.२४– येथील तक्रारदार प्रवीण सुरेश सोनवणे यांना वीज वितरण कंपनीने डिसेंबर २०१९ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीत प्रत्यक्ष वीज वापर शुल्क न आकारता सरासरी वीज आकारणी केली व ऑक्टोबर २०२१ च्या वीज शुल्कात समायोजित रक्कम रुपये १६ हजार २२९ एवढे वीज शुल्क आकारणी केल्याने त्यांनी धुळे जिल्हा ग्राहक आयोगाकडे याचिका दाखल केली. त्यावर ग्राहक आयोगाने अवाजवी अतिरिक्त वीज शुल्क आकारणी करता येणार नाही असा निर्णय दिला व अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रासासाठी तसेच तक्रारीच्या खर्चापोटी पंचवीस हजार रुपये महावितरण कंपनीस अदा करण्याचे आदेश दिले.**

तक्रारदार प्रवीण सुरेश सोनवणे यांना वीज वितरण कंपनीने अचानक माहे ऑक्टोबर २०२१ च्या वीज शुल्कात १६ हजार २२९ रुपये एवढ्या मोठ्या रकमेची आकारणी केल्याने त्यांचा आर्थिक बजेटच कोलमडला. त्यामुळे त्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण (पान ४ वर)

## निवडणूक निरिक्षक डॉ.विश्वनाथ यांचे नंदुरबारात आगमन

नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)–



नंदुरबार लोकसभा निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने निरिक्षक म्हणून वरिष्ठ सनदी अधिकारी डॉ. विश्वनाथ यांची नियुक्ती केली असून त्यांचे आगमन जिल्ह्यात झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मनीषा खत्री यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. निवडणुक कालावधीत डॉ.विश्वनाथ यांचे निवास टोकरतलाव रोड वरील सर्किट हाऊस मधील सातपुडा कक्षात असणार (पान ४ वर)



# निवडणूक शाखेकडून स्थिर सर्वेक्षण पथकाची नियुक्ती; वाहनांची तपासणी

**नवापूर, दि.२४ (प्रतिनिधी)– आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नियुक्त स्थिर सर्वेक्षण पथकाकडून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गणेश मिसाळ व तहसीलदार प्रशांत कुलकर्णी यांनी हे पथक नियुक्त केले आहे.**

लोकसभा निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडु नये, निवडणूक प्रक्रिया पारदर्शी पध्दतीने सुरळीत पार पडावी यासाठी विविध आघाड्यांवर प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. याच अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी व्हावी, शस्त्रास्त्रे, रोख रक्कम व मद्याची अवैध वाहतूक होऊ नये यासाठी पथकास वाहनांच्या तपासणीचे अधिकार देण्यात आले आहे. नंदुरबार लोकसभा मतदार संघातील नवापूर विधानसभा मतदारसंघाच्या परिघात राष्ट्रीय महामार्गावर बेडकी, गुजरात हद्दीवरील आहवा रस्त्यावर उकाळापाणी व खेकडा या तीन ठिकाणी हे पथक कार्यरत करण्यात आले आहे. तीनही ठिकाणी सहाय्यक निवडणूक अधिकारी गणेश मिसाळ व तहसीलदार प्रशांत कुलकर्णी, ज्ञानेश्वर वारे पोलिस निरीक्षक नवापूर पोलीस स्टेशन यांनी भेट देऊन पथक प्रमुख व सदस्यांना सुचना दिल्या. निवडणूक नायब तहसीलदार बी.एन. सोनवणे, संगायो नायब तहसीलदार दिलीप कुलकर्णी, निवासी नायब तहसीलदार सुरेखा जगताप पथकाच्या दैनंदिन कामकाजावर लक्ष ठेवून आहेत.

## मतदानाच्या दिवशी आठवडे बाजार बंद

धुळे, दि.२४– लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित झाला असून १६ मार्च, २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. ०१–नंदुरबार लोकसभा मतदार संघातंर्गत ०५– साक्री विधानसभा मतदार संघ व ०९–शिरपूर विधानसभा मतदार संघात सोमवार १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार लोकसभा निवडणूकीची संपुर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मतदानाच्या दिवशी आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी निर्गमित केले आहे. साक्री विधानसभा मतदारसंघात सोमवार १३ मे रोजी म्हसदी प्र.नेर, जैताणे, वार्सा येथे भरणारा आठवडे बाजार, १२ ते १४ मे, रोजी धाडणे येथे होणारा आई भवानी (पान ४ वर)

# भाजपने देश अन् राज्यातील वातावरण गढूळ केले नेरमधील प्रचारसभेत आ.कुणाल पाटलांचे टिकास्त्र

**धुळे, दि.२४– गेल्या दहा वर्षात भाजपाने देशातील आणि महाराष्ट्रातील राजकारण गढूळ केले आहे. राजकारण खालच्या पातळीवर नेऊन ठेवण्याचे काम भाजपाने केले आहे. महागाई, बेरोजगारी वाढली आहे, शेतीमालाला भाव नाही, जनता हैराण झाली आहे त्यामुळे आता परीवर्तन अटळ असल्याचा विश्वास आ.कुणाल पाटील यांनी नेर येथील मेळाव्यात व्यक्त केला. तर खोटी आश्वासने देऊन खा– सदार झालेले डॉ.सुभाष भामरे यांनी धुळे लोकसभा मतदार संघात कोणतेही ठोस विकासाचे काम केले नसल्याचा आरोप उमदेवार डॉ.शोभा बच्छाव यांनी यावेळी केला.**

धुळे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या प्रचारार्थ नेर ता.धुळे येथे आयोजित कार्यकर्ता व मतदार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ.सौ.शोभाताई बच्छाव यांच्या प्रचारासाठी आज दि.२४ रोजी सकाळी १० वा. नेर येथे महाविकास आघाडीचा कार्यकर्ता व मतदार मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात देऊर बु., देऊर खु.,नांद्रे, उभंड, चौगाव, लोणखेडी, मोराणे प्र.नेर, पिपरखेडे, लोहगड, कुसूंबा, गोताणे,



खेडे, सुट्रेपाडा, उडाणे, कुंडाणे (वार), सांजोरी, नेर,शिरधाणे, खंडलाय खु.,खंडलाय बु.,बांबुर्ले, अकलाड, भदाणे, कावठी यांच्यासह परिसरातील गावातून कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत शेतकऱ्यांच्या हितासाठी महाविकास आघाडीच्या उमदेवार डॉ.सौ.बच्छाव यांना विजयी करावे असे आवाहन केले.

यावेळी डॉ.शोभाताई बच्छाव म्हणाल्या की, भाजपा सरकारच्या काळात शेतकरी अडचणीत आहे. कांदा, कापूस तसेच इतर शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. खते, बि–बियाणे आणि शेती औजारे यांच्यावरही भाजपा सरकारने जीएसटी लावला. त्यामुळे शेतकरीविरोधी असलेल्या भाजपाच्या उमेदवाराला धडा शिकवावा असे आवाहन डॉ.शोभाताई बच्छाव यांनी केले.

आ.कुणाल पाटील म्हणाले की, होऊ घातलेली लोकसभा निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. या निवडणूकीतून देशाचे आणि महाराष्ट्राचे भवितव्य ठरणार आहे. गेल्या दहा वर्षात भाजपाने जातीधर्मामध्ये तेढ निर्माण करुन मनं कलुषित करण्याचे काम केले आहे. (पान ४ वर)

## निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान केंद्र स्थापन

नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी) – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणुक आयोगाने घोषित केला असून, मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांना मतदान करता यावे यासाठी टपाली मतदान केंद्राची स्थापना करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा खत्री यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. भारत निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या (पान ४ वर)

# आयएमएतर्फे धुळ्यात रविवारी हॉस्पीकॉन कार्यशाळा

धुळे दि.२४–भारतातील वैद्यकीय क्षेत्रात अग्रेसर **इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) च्या धुळे शाखेच्या वतीने रविवार दि.२८ रोजी क्युमाईन क्लब समोरील आयएमएच्या सभागृहात सकाळी ९ वाजेपासून हॉस्पीकॉन कार्यशाळा होणार आहे. यावेळी आयएमएच्या धुळे शाखेच्या वतीने नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा व वैद्यकीय क्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या दोन डॉक्टरांना सन्मानपूर्वक जीवनगौरव पुरस्कार वितरीत केला जाणार आहे. आयएमएच्या धुळे शाखेच्या वतीने कार्यशाळा व कार्यक्रम होणार आहे.**

हॉस्पीकॉन कार्यशाळेत सकाळी नऊ वाजेपासून डॉक्टर आणि आनंदाची गुरूकिल्ली या विषयावर डॉ.संजय जोशी (धुळे), हॉस्पिटलची इकॉनॉमी डॉ.राजीव अग्रवाल (मुंबई), स्व.वनमाला शहा ओरेशन लहान रूग्णालयाचे डिजिटलायझेशन या विषयावर डॉ.राखी अग्रवाल (मुंबई), मेडिकल लिगल केसेस या विषयावर डॉ.शिवकुमार उत्तुरे (मुंबई), जैविक घनकचऱ्याचा प्रश्न या विषयावर डॉ. मंगेश पाटे (मुंबई), रूग्णालयाची नोंदणी व परवाना नूतनीकरण, अग्निशमन सुविधा या विषयावर डॉ.संजय पाटील (पुणे) यांचे मार्गदर्शन होईल. त्यानंतर (पान ४ वर)

# गाळे मालकी हक्काबाबत प्रशासन न्याय देत नाही : लोंढेंची तक्रार


**धुळे, दि.२४– साक्रीरोड लगत चंपाबागेतील शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील गाळ्याच्या मालकी हक्का संदर्भात न्यायालयाने आपल्या बाजूने निर्णय देऊन देखील पोलीस प्रशासन, दारूबंदी विभाग आणि प्रशासन हे न्याय देत नसल्याचा आरोप आज दुकानाचे मालक गुलाबराव लोंढे यांनी पत्रकार परिषदेत केला.**

आपला महाराष्ट्र कार्यालयाच्या लगत असलेल्या मूळ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेत गुलाबराव लोंढे यांनी त्यांची



व्यथा मांडली. महानगरपालिका हद्दीतील चंपाबाग येथे झगाशेठ लोंढे शॉपिंग कॉम्प्लेक्स १९९३ मध्ये तयार करण्यात आले. यावेळी गाळा नंबर पाच त्यांनी १९९४ मध्ये सौ पुष्पजया प्रभाकर पाटोळे यांना विक्री केला. परंतु या गाळ्याचे (पान ४ वर)

## तृतीय पुण्यस्मरण



स्व.श्री.नानासो. प्रकाश दामोदर मराठे

मृत्यू दि.२५/०४/२०२१

*काळाचा महिमा काळच जाणे।*
*कठीण तुमचे अचानक जाणे ।*
*आजही घुमतो स्वर तुमचा कानी ।*
*तुमच्या प्रतिमेला श्रध्दांजली वाहतांना*
*डोळ्यात येते पाणी ।*

: शोकाकुल :

श्रीमती सुनिता प्रकाश मराठे
श्री.अभिजीत प्रकाश मराठे
सौ.दीपाली अभिजीत मराठे

फर्मस्

अभिजीत मेडिकल्स्
आर्या फार्मसी, ग.नं.४, धुळे

# धुळे लोकसभा मतदारसंघात मतदान, मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्रीस बंदी

**धुळे, दि.२४– धुळे लोकसभा मतदारसंघात सोमवार २० मे रोजी मतदान होणार आहे. तर मंगळवार ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. लोकसभा निवडणुका खुला, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने सर्व मद्यविक्री अनुज्ञप्ती मतदान प्रक्रिया संपण्याच्या वेळेपुर्वीच्या ४८ तासांमध्ये तसेच मतमोजणीच्या दिवशी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी निर्गमित केले आहे.**

जिल्हाधिकारी गोयल यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले की, नंदुरबार लोकसभा मतदारसंघात धुळे जिल्ह्यातील साक्री व शिरपूर तालुक्यांचा समावेश आहे. तसेच धुळे लोकसभा मतदारसंघाला लागुन साक्री व शिरपुर तालुका आहे. याकरिता धुळे लोकसभा मतदारसंघातील धुळे व शिंदखेडा तालुक्याचे सीमेला लागुन असलेल्या शिरपूर व साक्री तालुक्यातील ५ किलोमीटर अंतरात असलेल्या सर्व मद्यविक्री अनुज्ञप्त्या तसेच धुळे लोकसभा मतदासंघातील धुळे व शिंदखेडा तालुक्यातील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्याार मतदान प्रक्रिया संपण्याच्या वेळेपुर्वीच्या ४८ तासामध्ये तसेच मतमोजणीच्या दिवशी बंद ठेवाव्यात.

**असे असेल अनुज्ञप्ती बंदचे क्षेत्र**

धुळे लोकसभा मतदारसंघात सोमवार २० मे रोजी मतदान होणार असून धुळे लोकसभा मतदारसंघ (धुळे तालुका व शिंदखेडा तालुका) धुळे लोकसभा मतदारसंघाच्या सीमेपासून लागुन असलेल्या नंदुरबार लोकसभा मतदारसंघातील साक्री व शिरपूर तालुक्यातील ५ किलोमीटर अंतर तसेच साक्री तालुक्याला लागुन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या सीमेपासून साक्री तालुक्यातील ५ किलोमीटर अंतरावर शनिवार १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजे पासून पुढे, रविवार १९ मे रोजी पूर्ण दिवस तर २० मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहतील. तसेच मतमोजणीच्या दिवशी मंगळवार ४ जून रोजी संपुर्ण धुळे जिल्ह्यात संपूर्ण दिवस संबंधित अनुज्ञप्तीधारकांनी वरील दिवशी सर्व दुकाने बंद ठेवावीत. तसेच मद्यविक्री व अन्य व्यवहार करू नयेत. मद्यविक्री सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल आणि संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असेही गोयल यांनी आदेशात नमूद केले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -65,500 रु.+3% GST
सोने- 24 K -72,500 रु.+3% GST
चांदी- 82,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## बेसणा



स्व.ललितभाई एवं केतनभाई इनके
मातोश्री और चेरिश के दादीजी
जसवंतीबेन जयरामभाई सोलंकी
इनका दु:खद निधन सोमवार दि.२२ एप्रिल २०२४ को हो गया है । उनका
बेसणा गुरुवार दि.२५ एप्रिल २०२४ को दोपहर ४ से ६ बजे रखा है ।

-: शोकाकुल :-

केतनभाई जयरामभाई सोलंकी
चेरिश केतनभाई सोलंकी
एवं सोलंकी परिवार, धुलिया

स्थान : श्री सत्यनारायण ड्रेसेस
गली नं.२, जैन मंदिर के पास, धुलिया

# आपला महाराष्ट्र

# फळांच्या राजावर युद्धाची कृष्ण छाया

दरवर्षी प्रतिकुल हवामान, अवकाळी पाऊस, वादळे गारपीट, थंडी यामुळे कोकणात मोठ्या प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या हापूस आंब्यावर संकटे येत असतात. उत्पादनातील घट हे महत्त्वाचे कारण पुढे येते. परिणामी हापूस उत्पादक शेतकऱ्यांनी प्रचंड मेहनत घेऊनही त्यांचे अतोनात नुकसान होते. हापूस हा सर्व फळातील राजा मानला जातो. त्याची चव केवळ आपल्या देशातच नव्हे तर परदेशातील करोडोच्या संख्येने चाखणारे लोक आहेत. त्यांच्यासाठी हापूस मोठ्या प्रमाणावर निर्यात होतो. अमेरिका, ब्रिटन, न्युझीलँड, ऑस्ट्रेलिया आणि जपान सारख्या देशांमध्ये हापूसला प्रचंड मागणी असते. यावर्षी नेहमीपेक्षा हापूसचे उत्पादन चांगले झाले आहे. आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने या वर्षी एकूण ५००० टन हापूस निर्यात करण्याचे लक्ष ठेवलेले आहे. असे असताना, ते लक्ष यंदा निर्यात यंत्रणा गाठू शकणार नाही. थोडक्यात काय तर पुन्हा हापूस उत्पादकांना फटका बसणार आहे. दरवर्षी निसर्गाचा दणका बसतो पण यावर्षी मानवी संकटांचा मुकाबला निर्यातीला करावा करावा लागतोय. एप्रिलच्या मध्यापर्यंत बाराशे टन आंबा निर्यात होणे अपेक्षित होते परंतु निर्यात करणाऱ्या यंत्रणेकडून केवळ ६२५ टन आंब्याची निर्यात झालेली आहे. याचे कारण म्हणजे इजरायल पॅलेस्टाईन युद्ध होय. या युद्धामुळे समुद्र मार्गे जाणारा आंबा बंद आहे. त्यामुळे सगळी भिस्त ही हवाई मार्गे होणाऱ्या निर्यातीवर आहे. मात्र विमान कंपन्यांनी युद्धाचे कारण दाखवून वाहतुकीचे दर २५ टक्क्यांनी वाढविलेले आहेत तरीही निर्यातदार आंबा पाठवायला तयार आहेत पण कंपन्या भीतीमुळे विमाने उपलब्ध करून देत नाहीत. त्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. देशांतर्गत विशेषतः मुंबईत हापूसला मागणी भरपूर आहे. निर्यात बंद असल्यामुळे किंवा त्यात ५० टक्क्यांची घट आल्यामुळे आपल्या देशात हापूस सर्वसामान्यांना स्वस्तात मिळेल अशी अपेक्षा असली तरी तसे घडताना दिसत नाही. देशात किंवा महाराष्ट्रात मुंबई बाहेर ऐंशी ते शंभर रुपयाला एक आंबा असा दर आहे. एवढा महाग आंबा कोण खाणार? त्यामुळे हापुसचे तंत्र कळायला काही मार्ग नाही. हापूस नंतर केशर, बदाम, इत्यादी जातींच्या आंब्यांना मागणी आहे. हापूसच्या तुलनेत या आंब्याचे दर सर्वसामान्य माणसाला परवडतात. हापूसचे मात्र परवडत नाहीत. ते परवडावेत म्हणून आपल्याकडे कोणतीही उपाययोजना होत नाही. सरकार नावाच्या यंत्रणेचे आंबा व्यापाऱ्यांवर कुठलेही नियंत्रण नाही म्हणून सर्वसामान्य ग्राहकावरच मार पडतो.

बदाम आणि केशर यासारख्या जातीची फळे आता गुजरात मधून बलसाड भागातून मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात येतात. त्यांचा खप चांगला असतो. साधारणपणे जुलै महिन्याच्या मध्यापर्यंत हे आंबे बाजारात मोजूद असतात. गुजरातचा हापूस आणि कर्नाटकचा हापूस हे दोन पर्याय कोकणातल्या हापूस आंब्याला आहेत. परंतु कोकणच्या हापूसची चव या दोन्ही राज्यातील आंब्यांना येत नाही त्यामुळे तिथल्या आंब्याचे आकर्षण महाराष्ट्रात तरी फारसे नसते. परंतु अडचणीचा मुद्दा असा आहे की कोकणातल्या रतनागिरी देवगड, भागातील हापूस आंबा उर्वरित महाराष्ट्रात त्या नावाने विकला जात असला तरी तो तिथला असतोच असे नाही. त्यातही फसवणूक होते. हापूस आंब्याची ओळख हा सुद्धा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. विक्रेत्याने सांगावे आणि ग्राहकांनी घ्यावे अशी आपली अवस्था असल्याने नेमका कुठला हापूस आपण घरी नेतो याबद्दल शंका असते. शेवटी तो रसाच्या चवीवरूनच कळतो. त्यापेक्षा आपल्या गावराणी किंवा बदाम, बेगमपल्ली केशर या आंब्याचा रस चांगला अशी सर्वसामान्य ग्राहकांची धारणा तयार होते.अकाली पिकविलेला अनैसर्गिक पध्दतीने पिकविलेला आंबा जीवावर बेतणारा असला तरी नैसर्गिक पध्दतीने पिकविलेला आंबाच आता मिळत नाही ही मोठी समस्या आहे.तरीही लोक आंबा घेतात.मूळ हापूस ची ओळख ही देखील मुख्य अडचण असल्यामुळे चांगला हापूस लोकांच्या घरापर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती आहे. हापूस आंब्यावर एक मराठी चित्रपट बितलेला आहे. शेतीशी किंवा हापूसच्या उत्पादनाशी कवडीचाही संबंध नसलेले व्यापारी वर्गातील लोक कशाप्रकारे उत्पादक शेतकऱ्यांना घेरतात, त्यांचे शोषण करतात आणि जबरदस्तीने त्यांचा माल घेऊन मुंबईला किंवा परदेशात निर्यात करतात असा खेळ त्या चित्रपटात दाखविलेला आहे. यातून बाहेर पडून उत्पादक शेतकरी थेट प्रक्रिया उद्योगांशी संपर्क साधून स्थानिक पातळीवर पोहोचलेल्या व्यापाऱ्यांशी प्रसंगी संघर्ष करतात आणि योग्य भावात आंबा विकतात. हा चित्रपट प्रातिनिधिक असला तरी कोकणातील परिस्थिती तशीच आहे. कोकणात अजून एक बदल असा झाला आहे की बाहेरच्या लोकांनी कोकणात जाऊन मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी केल्या आहेत. त्या जमिनीत हापूस, काजू, मसाले, फणस, अननस, सुपारी आदी कोकणातल्या मेव्यांचे उत्पादन घेण्याचे काम सुरू केलेले आहे. यात स्थानिक शेतकरी कफल्लक झालेला आहे. आणि भांडवलदारांचे उखळ पांढरे झालेले आहे. म्हणजे हापूस असेल किंवा कोकणातील अन्य उत्पादने असतील ती भूमिपुत्रांच्या जीवावर उठलेली आहेत.

इजराइल आणि पॅलेस्टाईन युद्धाचे काळे ढग हापूस निर्यातीवर पडले त्याचा परिणाम या बाजारपेठेवर आणि उत्पादकांच्या उत्पन्नावर झालेला आहे हे तर खरेच. पण आपल्या देशापासून दहा ते वीस हजार किलोमीटर दूर असलेल्या देशात चालू असलेली युद्धे देखील आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करतात हेही दिसून आले आहे. युक्रेन रशिया दरम्यानचे युद्ध असेल किंवा इजरायल पॅलेस्टिनी युद्ध असेल त्या युद्धांचा सर्वप्रथम जो परिणाम होतो तो शेअर बाजारावर होतो. शेअर बाजारात गुंतवणूक करणारे अशा युद्धांमुळे अस्वस्थ असतात. वास्तविक या चढउतारांचा सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी काहीच संबंध नसतो. शेअर बाजार वधारला किंवा खाली आला यापैकी काहीही झाले तरी सामान्य माणसाचा प्रश्न रोजच्या पोटापाण्याचा आहे आणि तो शेअर बाजार सोडवू शकत नाही. मात्र हापूस आंब्यासारख्या फळांवर युद्धामुळे आलेले निर्यातीचे संकट सर्वसामान्य माणसांसाठी फायदेशीर ठरणारे आहे. कारण स्थानिक बाजारपेठेत तो आंबा स्वस्तात उपलब्ध होऊ शकतो. फक्त तो त्यांच्यापर्यंत पोहोचला पाहिजे. शेवटी निर्यातीचा फायदा थेट उत्पादकांना होत नाही.मधले जे दलाल असतात त्यांनाच तो होतो, अनुत्पादक ग्राहकांनाही निर्यातीमुळे तो उपलब्ध होत नाही. युद्धामुळे होऊ शकतो एवढे मात्र खरे.



# सोनगीरला विविध मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सव उत्साहात


**सोनगीर, दि.२४ (प्रतिनिधी)– येथे हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील बजरंग चौकातील मित्र मंडळाने हनुमानाचा जिवंत देखावा सादर केला. ग्रामपंचायत चौकातील पवनपुत्र हनुमान मित्र मंडळातर्फे मिरवणूक काढण्यात आली. सोनगीर व परिसरातील सर्व लहान मोठ्या हनुमान मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

येथील बजरंग चौक, ग्रामपंचायत चौक व परदेशी गल्लीतील हनुमान मंदिरामध्ये जन्मोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसाद (भंडारा) संपन्न झाला. येथील बजरंग चौकातील हनुमान मंदिरात सकाळी विधिवत पूजा करण्यात आली. तसेच दुपारी महाप्रसाद (भंडारा) संपन्न झाला. संध्याकाळी मिरवणूक निघाली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाणे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. माजी पंचायत समिती सदस्य अविनाश महाजन, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र महाजन, उपसरपंच लखन ठेलारी माजी सरपंच केदारेश्वर मोरे, माळी समाजाचे अध्यक्ष रवींद्र माळी यावेळी उपस्थित होते. श्रीराम सेना मित्र मंडळाच्या वतीने इंदोर येथील कलाकारांनी सादर केलेला हनुमानाचा जिवंत देखावा मिरवणुकीत सादर करण्यात आला. सदर आकर्षक जिवंत देखावा पाहण्यासाठी मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर उतरता दुतर्फा भाविकांनी गर्दी केली होती. बजरंग चौक, गांधी चौक, ग्रामपंचायत चौक, बाजारपेठ, अकबर चौक, आंबेडकर चौक या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने युवक वर्ग सहभागी झाला होता. मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी श्रीराम सेना मित्र मंडळाचे रोहित महाजन, रुपेश धनगर, कृष्णा पाटील, प्रथमेश माळी, निशांत धनगर, कुणाल पाटील, कृष्णा धनगर, कौशल महाजन, रोहित लोहार, हर्ष धनगर, टिंकू धनगर, मयूर धनगर, सचिन माळी, प्रेम धनगर, हर्षल माळी, वैभव महाले या युवकांनी मेहनत घेतली.

# पोलीस प्रशिक्षण केंद्रात मतदार जनजागृती कार्यक्रम

**धुळे, दि.२३– लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी संजय बागडे, महापालिका उपायुक्त संगीता नांदुरकर, मुख्य उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप उपक्रमाचे (जिल्हा परिषद) नोडल अधिकारी भाऊसाहेब अकलाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे येथे मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.**

यावेळी प्राचार्य विजय पवार यांनी २० मे रोजी होणाऱ्या मतदानांच्या दिवशी आम्ही मतदान करु व इतरांना मतदान करण्यास प्रवृत्त करण्याची ग्वाही दिली. मास्टर ट्रेनर दिनेश सैंदाणे यांनी पोलीस प्रशिक्षण केंद्रातील



पोलीस प्रशिक्षणार्थींना व्होटर हेल्पलाईन पबाबत माहिती दिली. तसेच मतदानाचे महत्व पटवून देवून येत्या लोकसभा निवडणुकीत सर्व मतदारांनी घराबाहेर पडून जास्तीत जास्त मतदान करुन मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी पोलीस प्रशिक्षणार्थींना प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजय पवार,उपप्राचार्य रामकृष्ण पवार, वर्ग प्रमुख तथा पोलीस निरीक्षक जयवंत पगारे,श्री. गुरव हे उपस्थित होते. स्वीप कार्यक्रमातंर्गत धुळे जिल्ह्यात मतदान जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालयात चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेवून नव मतदारांना मतदानासाठी आवाहन करण्यात येत आहे. असे स्वीप नोडल अधिकारी तथा परिविक्षाधिन नायब तहसिलदार मनोज जमदाडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.




**धुळे– हनुमान जयंती निमित्त धुळे शहरातील विविध ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागिरदार यांनी भेट दिली. त्यावेळी त्यांच्या समवेत धुळे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, पंकज भारस्कर, ज्ञानेश्वर पाटील, संजय जगताप, समीर खान, महेश भामरे, सोहेल काजी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.**

# शहाद्यातील आय.एम.आर.डी. महाविद्यालयात आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळा संपन्न

**शहादा, दि.२४ (प्रतिनिधी)– कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व श.ता. एज्यू.सोसायटी.अँड को.–ऑप.एज्यू. सोसायटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास विभाग व युवती सभेअंतर्गत संचालक डॉ.अनिल रंगराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहा दिवसीय आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आली.**

या कार्यशाळेत विविध विषयांवर व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सायबर क्राईम आणि सोशल मीडिया जागरूकता आणि सुरक्षा या विषयावर अँड.अब्दुल जब्बार शेख यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी बँकिंग व्यवहार माहिती आणि सावधगिरी या विषयावर विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे सहा. प्रा.इरफान पठाण यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी



महिला आरोग्य : समस्या व उपायफ या विषयावर डॉ.सोनाली पाटील यांनी विद्यार्थिनींसोबत संवाद साधला. कार्यशाळेच्या चौथ्या दिवशी स्त्री स्वयंरोजगार माहिती आणि संधी या विषयावर पिरामल फाउंडेशनचे रमेश जयंकर यांनी गांधी रिसर्च फेलोशिप व अनेक रोजगाराच्या संधी बाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पाचव्या दिवशी शितल अकॅडमीचे संचालक योगेश शेंडे यांनी नेतृत्व गुण सॉफ्ट स्किल सर्वांगीण विकास या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचा समारोप सहाव्या दिवशी विद्यार्थिनींनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन करून करण्यात आला. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष व पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनचे परीक्षक म्हणून महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आय. जे. पाटील, संचालक डॉ.अनिल पाटील तसेच विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप मराठे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.विजयकुमार गायकवाड, महिला विद्यार्थी विकास अधिकारी, प्रा.श्वेता पाटील, विभागप्रमुख प्रा.ताहीर मन्सुरी, प्रा. गायत्री पाटील, प्रा.नेहा देवरे यांनी परिश्रम घेतले.

कार्यशाळेसाठी संस्थेचे अध्यक्ष वनश्री मोतीलाल फकिरा पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पाटील, सचिव ए.के पटेल, संचालक तथा शहादा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्या सौ. प्रितीताई पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# दुसऱ्या टप्प्याचा प्रचार थांबला

मुंबई– लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला होणाऱ्या मतदानात आठ मतदारसंघातल्या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होईल. आज सायंकाळी या मतदार संघातील प्रचार थांबला. यात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ–वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या मतदारसंघाचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला होणाऱ्या मतदानात अमरावतीत नवनीत राणा, अकोल्यात प्रकाश आंबेडकर, परभणीत महादेव जानकर, नांदेडमध्ये प्रतापराव चिखलीकर, बुलढाण्यात प्रतापराव जाधव यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.


प्रकाश में ता.२५ को अंजाना




राजेंद्रकुमार, बबिता, प्राण, प्रेमचोप्रा, राजेंद्रनाथ, ज्यु.महेमूद

















**शब्दकोडे क्रमांक.१९१७**



**आडवे शब्द :** १.विरोध करणारे ४.विहीर ६.खास ९.तांबडा १०.उपवासाला फराळाकरीता वापरतात तो तांदूळ ११.टवरप-उलट लिहा १२.खुरापत,झाडाचा मधला गाभा १३.पाप १६.वस्तू,चीज १८.देवाचा चमत्कार २०.देह २१.सवत,राजेश खन्ना-पदमिनी कोल्हापुरे यांचा एक सिनेमा २२.पुष्कळ २३.घेराव २५.नि:स्वार्थ देणगी २७.शिकार २९.शिकवण ३०.वेळ,अवधी ३१.मनास लागलेली लक्ष्याची आस ३२.ऐतवार ३४.संभ्रमात टाकणारा,वेडावाकडा,विपरीत ३६.शत्रूवर कुरघोडी करण्यासाठी रचलेला डाव ३७.घोळका ३८.हिंदीत-थटटा ३९.आकाशात उंच उडणारा एक पक्षी ४०.धनुष्य ४१.शिकार करणारा ४३.इच्छा ४४.संयमन ४५.गवताचे पान ४६.चिंतातुर ,मनास लागलेंली काळजी ४७.पोरगा ४८.गाडी चालवणारा **उभे शब्द :** १.संभोगी २.भूमिका-इंग्रजीत ३.पहाटे खिडकीतून येणारे सुर्यकिरण ५.वधू-वराच्या लग्नाची मिरवणूक ६.भेळपुरीत वापरतात तो बारीक खादय पदार्थ ८.सहाकोन असलेला १३.झाडांची पाने गळण्याचा काळ १४.कलिका १५.पगार १७.पकड १९.झाडांची केलेली जोपासना २०.भींतीस पडलेली चीर २१.व्यापारी २४.गुपित २६.बातमी २७.हिंदीतील-'सौतेला' मराठीत २८.विस्मरण २९.प्रश्न३०.राजाच्या कार्यकारणी मंडळातील कार्यालय प्रधान ३३.मंथन ३४.आकाशात उडणारे एक वाहतुकीचे साधन ३५.बाजूला राहणारा ३७.हिंदीत-समाज,जुना काळ ३८.हिंदीत-घर ३९.धोकादायक ४०.सरोज ४१.होळी ४२.महाराणा प्रताप यांचा पराक्रमी घोडा ४३.कावळा ४४.विभाग,तुकडा ४५.भींतीवर राहणारा एक जीव

**शब्दकोडे क्रमांक.१९१६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सो | नू | नि | ग | म | | वे | ता | ळ | | खे | त |
| ने | | ल | त | | वा | ळ | वी | | आ | ळ | स |
| | स | म | का | ली | न | | ज | मा | व | | दी |
| मा | ह | | ळ | | र | थ | | ज | र | ब | |
| स | ज | ग | | तु | रा | | त | | ण | | वि |
| ळी | | र | वा | | ज | व | ळी | क | | तो | रा |
| | आ | ज | व | र | | सा | रा | | स | | ट |
| सा | | वं | | ग | ट | | म | न | मा | नी | |
| ब | र | त | न | | पा | ल | | रा | ज | | मे |
| र | सा | | स | वा | ल | | व | ध | | का | |
| म | ळ | का | | सा | | मी | | म | स | ल | त |
| ती | | ठ | ग | | स | ल | ग | | ल | वा | द |




# पटेल फार्मसी महाविद्यालयातील बावीस विद्यार्थ्यांची झायडस लाईफ सायन्स व मॅकलॉइड कंपनीत निवड



**शिरपूर, दि.२४- आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयातील अहमदाबाद येथील झायडस लाइफ सायन्स कंपनीत ११ व मुंबई येथील मॅकलॉइड फार्मास्युटिकल कंपनीत ११ असे एकूण २२ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीद्वारे द्वारे निवड झाली. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दमन, इंदोर, अहमदाबाद, बद्दी व गोवा येथील क्वालिटी कंट्रोल, क्वालिटी अश्युरन्स, प्रोडक्शन अश्या विविध विभागा मध्ये नोकरी करण्याची संधी प्राप्त झाली.**

झायडस लाइफ सायन्स हि अहमदाबाद येथे मुख्यालय असलेली भारतीय बहुराष्ट्रीय फार्मास्युटिकल कंपनी आहे, जी प्रामुख्याने जेनेरिक औषधांचे मोठे निर्माते आहे. झायडस लाइफ सायन्स कंपनीचे असित शुक्ला (सिनियर मॅनेजर ह्यूमन रिसोर्स), रुपेश झुनगरे (सिनियर मॅनेजर प्रोडक्शन) हे निवड करण्यासाठी उपस्थित होते. झायडस लाइफ सायन्स या या कंपनीने तृतीय वर्ष बी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांची निवड केली. तसेच त्यांना उन्हाळी सुट्ट्यांमध्ये ब्रिज कोर्सद्वारे प्रशिक्षण देऊन अंतिम वर्ष पूर्ण झाल्यावर कंपनीत नोकरी देण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना २.७० ते ३.७० लाखांचे वार्षिक पॅकेज देण्यात येणार आहे.

मॅकलॉइड फार्मास्युटिकल ही कंपनी १९८९ ला स्थापना झाली. कंपनी मुख्यतः डायबिटीस संबंधित औषधे, हृदय संबंधित औषधी निर्माण करते. मॅकलॉइड फार्मास्युटिकल कंपनीचे अश्विनी गुप्ता (सेंटर ऑफ एक्सेलन्स सिनियर ट्रेनर), रोहिदास पानसरे (सेंटर ऑफ एक्सेलन्स सिनियर ट्रेनर), हिरेन पटेल (ह्यूमन रिसोर्स एक्सिकेटीव्ह) यांनी निवड प्रक्रिया पार पाडली आणि मुलाखत घेतली. निवड प्रक्रियेत बुद्धिमत्ता चाचणी, विषयातील ज्ञान, टेक्निकल नॉलेज या टप्प्यात विविध निकषाद्वारे ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या कॅम्पस मुलाखतीसाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग प्लेसमेंट प्रमुख डॉ.अनिल टाटिया, डॉ.हितेंद्र महाजन, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर शितल महाले यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार जितेश जाधव यांचे सहकार्य लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरू डॉ.के. बी. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर आदींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नंदुरबारमधील पोरवाड वाडीमध्ये श्री गुसांईजी चरित्रामृत कथेचे आयोजन

**नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- शहरातील देसाईपुरा भागातील पोरवाडवाडी मध्ये दि.२६ ते २८ एप्रिल दरम्यान श्री गुसांईजी चरित्रामृत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील वैष्णव संप्रदाय समाज बांधवांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले आहे.**

वैष्णव संप्रदायाचे संस्थापक जगद्गुरु श्रीमद वल्लभाचार्य महाप्रभु यांचे द्वितीय पुत्र श्री विठ्ठलनाथजी (प्राकट्य वि.सं. १५७२) यांना वैष्णव संप्रदायात श्री गुसांईजी म्हणून ओळखले जाते. नंदुरबार येथील श्री समस्त गुजराती वैष्णव परिवारातर्फे पोरवाड वाडी मध्ये श्री गुसांईजी यांच्या जीवन चरित्र कथेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २६ ते २८ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमामध्ये कामवन सुरत येथील पंचम पीठाचे युवा वैष्णवाचार्य गोस्वामि १०८ श्री गोविंदरायजी महाराज यांना पाचारण केले जाणार आहे. कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी ईच्छुक वैष्णव बंधवांना श्री गोविंदरायजी महाराज यांचेकडुन ब्रह्मसंबंध दिक्षा दिली जाणार आहे.

दि.२६ रोजी सकाळी ११ वाजता युवा वैष्णवाचार्य श्री गोविंदरायजी महाराज यांचे सुरतहून मोटारीने आगमन होणार आहे. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजता पुष्टिधाम हवेली येथून पोथी यात्रा निघणार आहे. पोथी यात्रा वाणी गल्ली, जय हॉस्पिटल, श्रद्धा हॉस्पिटल, हनुमान मंदिर गल्ली मार्गे पोरवाड वाडीत पोहेचेल. सायंकाळी चार ते साडे सहा वाजेपर्यंत वैष्णवाचार्य श्री गोविंदरायजी महाराज हे श्री गुसांईजी यांच्या जीवन चरित्र कथेचे प्रवचन करतील. त्यानंतर नंदमहोत्सव साजरा केला जाणार आहे. दि.२७ रोजी सकाळी पुष्टिधाम हवेली मध्ये ईच्छुक वैष्णव बांधवांना श्री गोविंदरायजी महाराज यांचे कडून ब्रह्मसंबंध दिक्षा दिली जाईल. दुपारी साडे तीन वाजता कथास्थळी पोरवाड वाडीत गिरीराज स्थापना करण्यात येईल आणि चार ते सात या वेळेत चरित्र कथा प्रवचन होईल. दि.२८ रोजी दुपारी साडेतीन ते सहा वाजेपर्यंत चरित्र कथा प्रवचन होईल त्यानंतर श्री यमुना रासोत्सव आणि शेवटी श्री यमुना महाआरती करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे. कार्यक्रमात मनोरथी होऊ इच्छणाऱ्या वैष्णव बांधवांनी राजेंद्र जमनादास वाणी आणि ब्रह्मसंबंध दिक्षा घेऊ इच्छणाऱ्या वैष्णवांनी कौशिक पोपटलाल शाह यांच्याशी संपर्क साधावा तसेच शहरातील आणि परिसरातील वैष्णव संप्रदाय समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले आहे.

# नंदुरबारमधील शिक्षिका धनश्री आजगे यांना राज्यस्तरीय व्याख्याती प्रतिभारत्न पुरस्कार




**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)- येथील शिक्षिका तसेच व्याख्यात्या धनश्री अशोक आजगे यांना राज्यस्तरीय व्याख्याती प्रतिभा रतक पुरस्काराने गौरविण्यात आले. नुकताच व्यंकटेश बहुद्देशीय सेवा संस्था व गरुड फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आळंदी येथे आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी त्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले.**

अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचे सेक्रेटरी शिवाजी खांडेकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आळंदीचे माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर, माजी जनसंपर्क अधिकारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधुकर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. धनश्री आजगे ह्या धनगर समाज युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्षा आहेत. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व प्रभावी व्याख्यानांद्वारे महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश या तीन राज्यांत समाजप्रबोधन, महिला सक्षमीकरण, आदर्श युवक-युवती घडविण्याचे ते गेल्या आठ वर्षांपासून काम करीत आहेत. महापुरुषांनी चालवलेल्या सामाजिक चळवळी जिवंत ठेवण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत. आजवर त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर, राजे मल्हारराव होळकर, चक्रवर्ती छत्रपती यशवंतराव होळकर, छत्रपती शिवाजीराजे, माँ साहेब जिजाऊ, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले, फातिमाबी शेख, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या पुरुषांच्या जीवन चरित्रावर शेकडो व्याख्याने केली आहेत. धनश्री आजगे यांना आजपर्यंत राष्ट्रीय यशवंतरत्न पुरस्कार, माँसाहेब जिजाऊ राष्ट्रीय पुरस्कार, छत्रपती शिवाजी महाराज समाजसेवक पुरस्कार, अहिल्यारत्न राज्यस्तरीय पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत.



# शहाद्यातील शहा विद्यालयात प्रज्ञा शोध परीक्षा

शहादा, दि.२४ (प्रतिनिधी)- येथीलल शेठ व्ही. के. शहा विद्यालयात महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात आली. परीक्षेस १०७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यावेळी केंद्र संचालक प्रा.आय.डी.पटेल, तळोदा येथील वरिष्ठ पर्यवेक्षक दिलीप छगन पटेल, उपमुख्याध्यापक एस.आर.जाधव, पर्यवेक्षक सी.जी.पटेल, व्ही.डी. चौधरी, व्ही. ई. जावरे उपस्थित होते. परीक्षा यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कृष्णचंद्र पाटील यांचे निधन

शहादा, दि.२४- पिंगाणे ह.मु. स्वामीनारायण नगर, डोंगरगाव रोड, शहादा येथील कृष्णचंद्र छगन पाटील (वय ८०) यांचे दि.२१ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता निधन झाले. त्यांचे पश्चात पतवी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. सूरगस ता.अक्कलकुवा येथील अनुदानित आश्रम शाळेतील शिक्षक प्रदीप पाटील यांचे वडील होत.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व वित्तीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व संबंधित व हितसंबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** तुकडी जिल्हा धुळे पोटतुकडी तालुका धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.५२८/१-४ पैकी प्लॉट नं.६ चे एकूण क्षेत्र ४१०० चौरस फुट यातील पूर्व बाजुकडील क्षेत्र १८०० चौरस फुट म्हणजेच १६७.२ चौरस मीटर्स त्यात असलेल्या दगड, माती, विटा तिच्या तदंगभुत वस्तुंसहची आर.सी.सी. बांधीव इमल्यासह मिळकत त्यासी चतु:सिमा येणेप्रमाणे-

पुर्वेस- २५ मीटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं.६ चे उर्वरीत २३०० चौरस फुट क्षेत्र, दक्षिणेस- २० मीटर रूंदीचा रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं.७.

सदर मिळकत खरेदी घेण्याचा सौदा आमचे पक्षकारांनी सौ.शोभाबाई शांताराम पाटील, रा.मु.पो.फागणे, ता.जि.धुळे यांचेकडून केला आहे. त्यांचे निर्वेध मालकी हक्काची आणि निर्वेध प्रत्यक्ष कब्जे उपभोगाची निश्चिती करून घेण्यासाठी (टायटल व्हेरीफिकेशन) ही नोटीस देण्यात आली आहे.

तरी सदर मिळकतीत कोणाचेही, कोणतेही, कुठल्याही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, बोजा, टांच, जप्ती, भाडेहक्क, लिजहक्क, ताबा हक्क, सौदे करार हक्क, खरेदी हक्क व इतर काहीही असल्यास तसेच संकल्पित व्यवहारास कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्याबाबतचे पुराव्याचे कागदपत्रांचे साक्षांकित झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील पत्त्यावर कळवावे. ती मुदत संपल्यानंतर आमचे पक्षकार सौदा पूर्ण करतील. त्यानंतर कोणी काही तक्रार केल्यास ती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या दस्तऐवजावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

**धुळे, दिनांक- २४/०४/२०२४.**

**ॲड.यतीश गिरिधरलाल गुजराथी**

'उषागिरी', प्लॉट नं.६, भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे.

मो.नं.९४२३९७९६११, ९८२३०७२७५१

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**SHAEWANA BANO SHAKIL AHMED**
MY NEW NAME IS
**ANSARI SHAHEWANA BI SHAKIL AHMAD**
ADD- HOUSE NO.346 CS NO.363 ATI, MOLVIGANJ, NEAR YAQUB SETH FACTORY, DHULE-424001

## CHANGE OF NAME

I have Change My Name From Old Name
**UMAIR ANJUM RAEES AHMED ANSARI**
to New Name
**UMAIR ANJUM RAEES AHMAD ANSARI**
as per Documents
Address:- PLOT NO.7 FISH MARKET NEAR BAHELUL KHUT, DHULE

## जाहीर नोटीस

तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, इत्यादी यांना जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे, नकाणे ता.धुळे जि.धुळे येथील स.नं. ९०/1C२ यापैकी १) प्लॉट नं.१ चे एकूण क्षेत्र २५१.८७ चौ.मी., २) प्लॉट नं.२ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी., ३) प्लॉट नं.३ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी., ४) प्लॉट नं.४ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी., ५) प्लॉट नं.५ चे एकूण क्षेत्र १८४.०६ चौ.मी., ६) प्लॉट नं.६ चे एकूण क्षेत्र २१४.६२ चौ.मी., ७) प्लॉट नं.७ चे एकूण क्षेत्र १७० चौ.मी., ८) प्लॉट नं.८ चे एकूण क्षेत्र १७० चौ.मी., ९) प्लॉट नं.९ चे एकूण क्षेत्र १७० चौ.मी., १०) प्लॉट नं.१० चे एकूण क्षेत्र २४६.५० चौ.मी., ११) प्लॉट नं. २६अ चे एकूण क्षेत्र १३६ चौ.मी., १२) प्लॉट नं. २६ब चे एकूण क्षेत्र १३६ चौ.मी., १३) प्लॉट नं.२७चे एकूण क्षेत्र १८७ चौ.मी., १४) प्लॉट नं.२८ चे एकूण क्षेत्र २३३.७५ चौ.मी., या चौदा प्लॉटसच्या चतु:सीमा मंजुर लेआउट प्रमाणे येणे प्रमाणे चौदा बखळ प्लॉटस् आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाना रक्कम अदा केलेली आहे. वरील चौदा बखळ प्लॉटस् संबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, राष्ट्रीयकृत बॅक बोजा, पतसंस्था बोजा, को.ऑप.बॅक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुख्त्यारपत्र अधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलांची खात्री करून द्यावी. मोबाईलव्दारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राव्दारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील चौदा बखळ प्लॉटस्वर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे. **धुळे, दिनांक- २४/०४/२०२४.**

**ॲड.श्री.अमित अशोक वाघ**

२२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.

मो.नं.९८२३१३६००७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे देवपूर येथील स.नं.५३ पैकी प्लॉट नं.८ चे क्षेत्र ४६८.३२ चौ.मी. यास वि.सि.स.नं.७३३० चे एकूण क्षेत्र ४६४ चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र २५२० चौ.फुट यामध्ये लक्ष्मी अपार्टमेंट या नावाने रहिवासी इमारती मधील स्टिल्ट ग्राउंड फ्लोअर वरील सदनिका नं. जी-२ चे क्षेत्र ३७.४३ चौ.मी. ची बांधीव रहिवासी सदनिका. त्यासी चतु:सिमा :- पुर्वेस- फ्लॅट नं.जी-१ आणी फ्लॅट नं. एफ-३, पश्चिमेस- प्लॉट नं.८८ मधील जागा, उत्तरेस- प्लॉट नं.८८ मधील रिकामी जागा, दक्षिणेस- प्लॉट नं.८८ मधील रिकामी जागा, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील सदनिका ही श्री.जोगेश्वरी इंफ्राकॉन प्रा.लि. तर्फे चेअरमेन श्री.केदारनाथ गंगाधर बधान रा.बालाजी मंदिरा समोर, ग.नं.४, धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे सदनिका ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर सदनिकेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, सदनिके वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर सदनिका संबंधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६ (सहा) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर सदनिका निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहू सदनिकेचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. **दिनांक- २४/०४/२०२४.**

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**

ग.नं.४, भांडी बाजार, कांती कॉम्प्लेक्स शेजारी, धुळे.

मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७

## जाहीर नोटीस

नि.6/D

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब क.स्तर यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं.३२७/२०२४

१) श्रीमती. सुरेखा सुरेश निकुंभे वगैरे २ ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

सुरेश अभिमन निकुंभे, उ.व.१९,

मृत्यू दिनांक- २३/०५/२००२. ..... **मयत**

सुरेश अभिमन निकुंभे (मयत दिनांक: २३/५/२००२) मयताचा पत्ता- रा.वाडी बुद्रुक ता.शिरपूर जि.धुळे

सदरील जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार १) श्रीमती. सुरेखा सुरेश निकुंभे २) श्री.रविंद्र सुरेश निकुंभे ३) श्री.विजय सुरेश निकुंभे असे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडिल नामे सुरेश अभिमन निकुंभे हे दिनांक २३/०५/२००२ रोजी घातपाताने मयत झाला आहे. मयतास अर्जदार १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर शिरपूर यांचे न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दिनांक: १३/०६/२०२४ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर रहावे. अन्यथा अर्जदाराचा लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारां व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाहीत, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर, शिरपूर जिल्हा. धुळे. यांचे आदेशावरुन सही शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे. दि.०५/०४/२०२४.

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क.स्तर, शिरपूर — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.३४१/२०२४

१) उमेश विठ्ठल सोनार, २) ज्योती सुभाष सोनार,
३) मनिषा मनोहर सोनार, ४) रोहिणी विवेक मोरे,
५) मोनिका संभाजी सोनार, ६) शंकुतला विठ्ठल सोनार,
सर्व रा.वाल्मीक नगर, शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

X

विठ्ठल पोपट सोनार (मयत), मृत्यू दि.०६/०३/२०२४,
रा.४९ किरण सोसायटी, निमझरी नाका, शिरपूर, जि.धुळे ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत नामे विठ्ठल पोपट सोनार हे दि.०६/०३/२०२४ रोजी विघ्नहर्ता हॉस्पीटल, धुळे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा माडांवयाचा असल्यास यांनी दि.१४/६/२०२४ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार कला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जा बाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि.८/४/२०२४ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

तु.जि.धुळे पो.तु.ता.शिरपूर, मौजे शिरपूर बु, ता.शिरपूर, जि.धुळे येथील बिनशेती स.नं.९/१/१/१/२/१/३ पैकी प्लॉट नं.३९ब, याचे क्षेत्र- १२७.५० चौ.मी. पैकी पश्चिमेकडील क्षेत्र- ६३.७५ चौ.मी. व त्यावरील बांधकाम- ४३.४१ तळमजला ४३.४१ चौ.मी. पहिला मजला ही मिळकत इस्माईल शे कालु यांचे मालकीची व कब्जे उपभोगात आहे.

वरील मिळकत आमचे अशिल दिपक प्रल्हाद पाटील, रा.किरण सोसायटी जवळ, शारदा नगर, शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे यांनी **HDFC Bank ltd, Dhule** यांचेकडून अर्थसहाय्य घेवून कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केला आहे तरी सदर मिळकती संबंधी कोणाचे खरेदी, विक्री, गहाण, बक्षीस, टांच, जप्ती, भाडे करारनामा, मुख्त्यापत्र, अधिकार, बोजा, वारसाहक्क, पोटगीहक्क, बँकबोजा, पतसंस्थाबोजा अगर इतर हस्तांतरीत हक्क अधिकार असल्यास खालील पत्यावर ५ दिवसाचे आत कळविण्यात यावे व मुळ कागदपत्र दाखवून आमची खात्री करून द्यावी मुदतीत लेखी हरकती अथवा तक्रार न आल्यास सदर मिळकती निर्बोज समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती बंधनकारक राहणार नाहीत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- शिरपूर,
दिनांक- २४/०४/२०२४.

**ॲड.नरेंद्र आर.करंकाळ**

ऑफिस- कोर्ट आवार, ता.शिरपूर, जि.धुळे.

मो.नं.९९२३९००४००

## जाहीर नोटीस

मंगलाबाई शालिक दोरीक रा.नवे भामपूर ता.शिरपूर जि.धुळे यांच्या तर्फे तमाम जनतेस कळविण्यात येते की,

माझे पती नामे शालिक ओंकार दोरीक हे मौजे नवे भामपुर येथून दि.०४/०५/२००८ पासून घरातून शिरपूर येथे गेले असता, परत आलेले नाही. त्यांचा या दरम्यान अनेक ठिकाणी व गावी तसेच नातेवाईकांकडे जावून तपास केला असता, ते आजपावेतो कुणासही दिसून आलेले नाही.

त्यांचा आजपर्यंत बराच शोध घेतला परंतु ते मिळून आलेले नाहीत अथवा ते हयात असल्याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे ते परागंदा झालेले आहेत. असे दिसून येत आहे.

तरी शालिक ओंकार दोरीक रा.नवे भामपूर हे कुणासही दिसून आलेले असल्यास अथवा हे कोठे आहेत या बाबत माहिती असल्यास वरील पत्त्यावर कळविण्याचे करावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे. दिनांक- २४/०४/२०२४.

**ॲड.संजय दिनानाथ सानफ**

कॉलेज रोड, कोर्टाच्या गेट समोर, शिरपूर जि.धुळे. पिन-४२५४०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

७/१२ उताराप्रमाणे- स.नं.४२०/१ब/२अ२/२अ२ पैकी प्लॉट नं.७ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ९० चौ.मी. बखळ प्लॉट.सि.स.उताराप्रमाणे- सि.स.नं.१४११७ चे एकूण क्षेत्र १३५ चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ९० चौ.मी. बखळ प्लॉट हे हाकीमुल्लाह समुल्लाह खान यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक हाकीमुल्लाह समुल्लाह खान, रा.जामचा मळा, धुळे. यांचे तर्फे वि.मु.अशरफ शाह आरीफ शाह, रा.४० गाव रोड, गजानन कॉलनी, धुळे यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुख्त्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

**धुळे, दिनांक- २४/०४/२०२४.**

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**

पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.

मो.नं.९८८१९२९४२४

निशाणी - ६

ॲडव्होकेट, भारती प्रशांत सोनार, धुळे

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर साहेब, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.५४६/२०२४

१. संगीता मधुकर लोकरे, उ.व.७२, धंदा- घरकाम,
आधार नं.६०१३४८२५३६४२
रा.न.प.बालक मंदिर स्टेशन विभाग, मुर्तिजापूर, अकोला-४४४१०७
२. लक्ष्मी श्रीकांत कोळवले, उ.व.६३, धंदा- घरकाम,
आधार नं.६२११३२०७७२४९, मो.नं.९०११८१४०१९,
रा.मु.पो.मोरशेवडी एम.आय.डी.सी. धुळे-४२४००६ ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही आणि ..... **गैरअर्जदार**

कै.सुभद्रा विठोबा शेवतकर, आधार नं.७८८९८७६७८५२५,
रा.पंचवटी नगर, चाळीसगांव रोड, धुळे, मृत्यू दिनांक- २४/०१/२०२४,
मृत्यू ठिकाण- पंचवटी नगर, चाळीसगांव रोड, धुळे ..... **मयत**

ज्याअर्थी दिनांक ०८/०४/२०२४ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे त्याआर्थी वरील अर्जदार क्र.१ ते अर्जदार क्र.२ हे मयत कै.सुभद्रा विठोबा शेवतकर यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यासंदर्भात वारस दाखला (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे येथील मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याआर्थी मे.न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करिता चौकशी तारीख १५/०६/२०२४ हि निश्चीत केलेली आहे. त्याआर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधीताना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मे.७वे सह न्यायाधीश क.स्तर, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर कामी कोणाचाही काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येऊन सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे.न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक- १६/०४/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, मे.दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे — कोर्टाचा शिक्का — अधिक्षक, मे.दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.७५/२ पैकी प्लॉट नं.६६ चे एकूण क्षेत्र ६२.५ चौ.मी. यांस वि.सि.स.नं.२८२५ चे क्षेत्र ६१.२० चौ.मी., सत्ता प्रकार 'क' यासी चतु:सिमा पुर्वेस- प्लॉट नं.६५, पश्चिमेस- प्लॉट नं.६७, दक्षिणेस- प्लॉट नं.१०९, उत्तरेस- रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.दगा धुडकू चव्हाण, रा.५४, जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री.रविंद्र जिवन मराठे, रा.श्रीनगर, बिलाडी फाट्या जवळ, देवपूर, धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. या व्यतिरिक्त सदरहू मिळकतबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २४/०४/२०२४.

**ॲड.विजय म.मोरे**

नोटरी - भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.

मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, इत्यादी यांना जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे, वलवाडी ता.धुळे जि.धुळे येथील स.नं.१४०/४ यापैकी प्लॉट नं.१८ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी., या प्लॉटसच्या चतु:सीमा पुर्वेस- ६ मी. रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं.२७, दक्षिणेस- प्लॉट नं.१९, उत्तरेस- ९ मी.रस्ता. येणे प्रमाणे बखळ प्लॉट स्नेहलता रावसाहेब महाजन रा.श्रीजी आपार्टमेंट, शांतीवन टॉवर जवळ, माजिवाडा, ठाणे वेस्ट, ठाणे यांचे मालकीचा व उपभोगातील असून यांचे ज.मु. म्हणून श्री.प्रविण नवनित जगताप रा.प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे यांचेकडून आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाना रक्कम अदा केलेली आहे. वरील बखळ प्लॉट संबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, राष्ट्रीयकृत बॅक बोजा, पतसंस्था बोजा, को.ऑप.बॅक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुख्त्यारपत्र अधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशीलांची खात्री करून द्यावी. मोबाईल व्दारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राव्दारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील बखळ प्लॉटवर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे. धुळे, दिनांक- २४/०४/२०२४.

**ॲड.श्री.अमित अशोक वाघ**

२२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.

मो.नं.९८२३१३६००७



## जिल्हा ग्रंथालय परिसरात मतदार जनजागृती कार्यक्रम

धुळे, दि.२४– मतदार जनजागृती कार्यक्रमातंर्गत धुळे शहर विधानसभा मतदार संघ, अपर तहसिल कार्यालय,धुळे शहर तसेच नेहरु युवा मंडळ,म्हसाळे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा ग्रंथालय आवार परिसरात येथे मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी धुळे शहर मतदारसंघाच्या सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सीमा अहिरे, अपर तहसिलदार वैशाली हिंगे, स्वीप नोडल अधिकारी तथा परिविक्षाधिन नायब तहसिलदार मनोज जमदाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी जिल्हा ग्रंथालयात अभ्यासिकेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मतदान करणे तसेच मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यासाठी व्होटर हेल्पलाईन पबाबत माहिती दिली. शाहीर सुभाष कुलकर्णी यांनी मतदाराचे प्रबोधन कार्यक्रम सादर करुन मतदानाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमांस विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

# पूरपाण्याने नकाणे–हरण्यामाळ तलाव न भरण्याची घोडचूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**धुळे,दि.२४–पावसाळ्यात नकाणे व हरण्यामाळ तलाव पांझरेच्या पुर पाण्याने भरून न घेण्याची घोडचुक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन नागरी सेवा सुविधा समिती चे निमंत्रक, जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व आरटीआय कार्यकर्ते योगेंद्र जुनागडे यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना दिले आहे.**

या निवेदनात त्यांनी नमुद केले आहे, की धुळे शहराला पाणी पुरवठा करणारे नकाणे व हरण्यामाळ तलाव हे दोन प्रमुख स्त्रोत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात पांझरा नदीच्य पुराचे वाहून जाणारे पाणी जम्बो कॅनल द्वारा त्यात भरून घेवून शहराला पुरविले जाते. फक्त यावर्षी पावसाळ्यात हे तलाव भरण्यात आले नाहीत. त्यामुळे अक्कलपाडा धरण भरल्यावर शेकडो–हजारो एमसीएफटी पांझरा पुराचे पाणी वाहून वाया गेले.

यावर्षी नकाणे–हरण्यामाळ हे दोन्ही तलाव मिळून सुमारे आठशे एमसीएफटी पाणी साठवले गेले नाही. हे तलाव फेब्रुवारीतच कोरडे पडले. हे सातशे ते आठशे एमसीएफटी पाणी आता एप्रिल–मे च्या कडक उन्हाळा व पाणी टंचाईत धुळे शहराला दिले असते किंवा पांझरेत सोडले असते तर धुळे ते मुडावद असे धुळे–शिंदखेडा–अमळनेर तालुक्याच्या पंचवीस तीस गावांना पिण्याचे पाणी टंचाई दूर करण्यासाठी उपयोगात पडले असते. अक्कलपाडा धरणातून या गावांसाठी आता पांझरेत पाणी सोडल्याने या धरणाची पाणी पातळी कमी झाली. त्यामुळे धुळे शहर पाणी योजनेच्या जॅकवेल पर्यंत पाणी येत नाही. त्यासाठी मनपाला धरणात चारी खणावी लागत आहे.त्यामुळे धुळेकरांचा पाणी पुरवठा बाधित झाला आहे. तीन वरून सहा–सात–आठ दिवसावर हा पाणी पुरवठा गेला आहे. ऐन उन्हाळ्यात नागरिकांचे हाल वाढले आहेत. मुळ स्त्रोत असणारे नकाणे–हरण्यामाळ तलाव भरून घेतले असते तर ही समस्या आली नसती.

सदर प्रकरणी दरवर्षी प्रमाणे यावर्षीही नकाणे–हरण्यामाळ तलाव भरून न घेण्यासाठी, या घोडचूकसाठी कोण जबाबदार आहेत? त्यावर काय कारवाई झाली? म्हणून वारंवार माध्यमांमधुन लिखाण झालेले आहे. परंतु या संवेदनशील विषयावर प्रशासनाने नागरिकांसाठी अद्याप काही एक खुलासा केलेला नाही. ही गंभीर बाब आहे. याबाबत तातडीने आपत्ती व्यवस्थापन व टंचाई प्राधान्य गृहित धरून चौकशी करावी. त्यातील दोषींवर कर्तव्यात कसुरी बाबत कठोर कारवाई करावी. या सर्व प्रकियेची माहिती पाणी टंचाईने बाधित धुळेकर नागरिकांना विशेष पत्रकार परिषद घेवून अवगत करून द्यावी, अशी मागणी जुनागडे यांनी केली आहे.

पान १ वरुन

### मतदानाच्या दिवशी आठवडे बाजार बंद

मातेचा यात्रोत्सव तसेच शिरपूर विधानसभा मतदारसंघातील तोंदे, म.दोंदवाडे, शिरपूर ब्रु, शिरपूर खु, वरवाडे गावात भरणारे आठवडे बाजार बंद ठेवण्यात येवून ते दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावे, असेही गोयल यांनी आदेशात नमूद केले आहे.

### टपाली मतदान केंद्र स्थापन

मतदारांना टपाली मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी मतदार सुलभता केंद्र स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील ०१–अक्कलकुवा, ०२–शहादा, ०३– नंदुरबार, ०४–नवापूर या ४ तसेच धुळे जिल्ह्यातील ०५–साक्री, ०९–शिरपूर या २ अशा एकूण ६ विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांना हक्क टपाली मतपत्रिकद्वारे बजावता यावा यासाठी १०, ११ व १२ मे २०२४ पर्यंत सकाळी ९ वाजेप–ासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जुनी भुसंपादन शाखा, पहिला मजला, अपर जिल्हाधिकारी यांचे दालनाच्या पश्चिमेकडील पुर्व पश्चिम हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे टपाली मतपत्रिकद्वारे मतदान करता येणार आहे. असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी, यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

पान १ वरुन

### भाजपने बावीस अब्जाधीश

मनरेगाचा पैसा नरेंद्र मोदी यांनी २२ श्रीमंतांना वाटला असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

**बेरोजगार युवकांना अप्रेंटिसशिपचा अधिकार देणार**

राज्यातील आशा आणि अंगणवाडी सेविकांचे उत्पन्न देखील दुपटीने वाढवणार असल्याचे आश्वासन राहुल गांधी यांनी दिले आहे. खासगी क्षेत्रात आणि सरकारी नोकरीत महिलांना ५० टक्के आरक्षण आम्ही देणार असल्याचे देखील राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ही पहिली यादी झाली, आता दुसरी यादी देखील आम्ही देत असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. पहिल्या यादीमध्ये भारतातील सर्वात गरीब कुटुंबीयांना एक लाख रुपये देत आहोत तर दुसऱ्या यादीत बेरोजगार युवकांना अप्रेंटिसशिपचा अधिकार आम्ही देणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले आहे.

### पीआय वारे यांना लाच घेतांना पकडले

आज दुपारी लाच घेतांना रंगेहाथ पकडले. या कारवाईची सविस्तर माहिती मात्र उशिरापर्यंत मिळू शकली नाही. परंतु या कारवाईची माहिती मिळताच जमावाने पोलीस वाहनावर दगडफेक केली. वारेंना तात्काळ अटक करा, अशी जमावाची मागणी होती, असे सांगण्यात येत आहे. यामुळे पोलीस ठाण्याच्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### मोदींच्या भाषणाची चौकशी सुरु

मुस्लिमांचा पहिला हक्क असल्याचे म्हटले होते. याचा अर्थ ते मालमत्ता कोण गोळा करतील आणि ज्यांना जास्त मुले आहेत त्यांना घुसखोरांना वाटून देतील. तुमच्या कष्टाचे पैसे घुसखोरांना देणार का? तुम्ही हे मान्य कराल का?

### वीज शुल्क आकारणी करता येणार नाही

आयोगाकडे धाव घेतली व वीज वितरण कंपनीने कुठलीही पूर्व सूचना न देता परस्पर सरासरी शुल्क आकारणी करून अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब केल्याचे सिद्ध केले. तसेच रीडिंग घेणे, त्यावर शुल्क आकारणी करणे या सर्व बाबींसाठी वीज वितरण कंपनीच जबाबदार आहे त्या बाबींशी ग्राहकाचा कुठलाही संबंध येत नसताना त्याला जबाबदार धरता येणार नाही ही बाब देखील शाबित केली. त्यावर आयोगाने आपल्या अठरा पानी निकालात अर्जदारांना एकूण २५ हजार रुपये नुकसान भरपाई मंजूर केल्याचे आदेश दिले. न्यायासनावर अध्यक्षा सौ.नीता एन देसाई व सदस्य सौ.प्रतिभा पाटील, सौ.रसिका निकुंभ हे होते. तक्रारदार यांनी स्वतः युक्तिवाद केला. यासाठी त्यांना आर.बी. पाटील, माहिती अधिकार क्लिनिकचे संचालक तेजस पाटील व महाराष्ट्र ग्राहक पंचायतचे शहर अध्यक्ष ॲड.चंद्रकांत येशीराव यांचे सहकार्य लाभले.

### दोघांवर गुन्हा दाखल

हॉस्पिटलमध्ये १२ महिन्यात ३ हजार ११८ युनिट वीज चोरी करण्यात आली असून शोयब खान अय्युब खान याच्या विरुद्ध वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७१ हजार ५१० तडजोड रक्कम न भरल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### डॉ.विश्वनाथ यांचे नंदुरबारात आगमन

आहे. तेथे नागरिकांच्या भेटीसाठी ते सकाळी ११ ते १२ या वेळेत उपस्थित राहणार आहेत. त्यांचा दूरध्वनी क्रमांक ०२५६४–२९९३०५ असून भ्रमणध्वनी क्रमांक ७०२०७१४७२५ हा आहे. नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहनही जिल्हा निवडणूक अधिकारी मनीषा खत्री यांनी केले आहे.

### ..राज्यातील वातावरण गढूळ केले

राजकारणाचा स्तर घसरला असून भाजपाने राजकारण गढूळ केले आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव नाही, तरुणांनार रोजगार नाही, महागाई प्रचंड प्रमाणात वाढली असल्याने जनता हैराण झाली आहे. त्यामुळे परिवर्तन अटळ असून देशात इंडीया आघाडीची सत्ता येणार आहे. म्हणून धुळे लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमदेवार डॉ.सौ.शोभाताई बच्छाव यांना विजयी करुन रखलेल्या विकासाला चालना द्यावी असे आवाहन आ.पाटील यांनी शेवटी केले.

व्यासपीठावर शिवसेना प्रमुख अतुल सोनवणे, धुळे तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे, कैलास पाटील, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, संचालक साहेबराव खैरनार, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, संचालक एन.डी.पाटील, सुरेश भिल, जि.प.सदस्य आनंद पाटील, सरपंच गायत्री जयस्वाल, जि.प.सदस्य अरुण पाटील, शिवसेनेचे मनिष जोशी, गणेश जयस्वाल, डॉ.दत्ता परदेशी, शिवाजी पाटील, डॉ.विलास बिरारीस, दिलीप बिरारी, भानुदास माळी, बापू खैरनार, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश गर्दे, डॉ.विजय देवरे, डिगंबर देवरे, संचालक प्रकाश पाटील, ऋषीकेश ठाकरे, डॉ.संदिप पाटील, नामदेव माळी, बाळू आण्णा सोनवणे, दिंगबर परदेशी, पुंडलिक माळी, उपसरपंच दयाराम पारधी, बापू खताळ, धर्मदास बागुल, यांच्यासह परिसरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### गाळे मालकी हक्काबाबत..

बांधकाम अपूर्ण असल्यामुळे खरेदी दाराला तात्पुरत्या स्वरूपात गाळा क्रमांक सहा वापरण्यासाठी दिला. त्यानंतर गाळा नंबर ५ बांधकाम पूर्ण होऊन देखील संबंधिताने त्याला तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास दिलेला गाळा क्रमांक सहा हा परत केला नाही. कालांतराने त्याने हा गाळा २००५ मध्ये सोनल दिलीप शिंदे यांना विकला. या नंतर गाळा क्रमांक सहा संदर्भात खोटे कागदपत्र तयार करण्यात आले. विशेष म्हणजे या गाळ्यात एका मद्य विक्रीचे दुकान देखील कागदोपत्री स्थलांतरित करून घेण्यात आले. मद्य विक्रीचे दुकान सुरू असलेल्या गाळा क्रमांक सहा हाच गाळा क्रमांक पाच असल्याचे दाखवण्यासाठी संबंधितांनी गाळा क्रमांक पाच खरेदी करताना दाखवलेल्या चतु:सीमेमध्ये गोलमाल करण्यात आला. विशेषता पाच नंबरच्या बाजूला सरळ सात नंबर असल्याचा फेरफार करण्यात आला. तशी नोंद बांधकाम आराखड्यात देखील करण्यात आली. त्यामुळे आपण या संदर्भात २००९ मध्ये न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला. या दाव्याच्या कामकाजाच्या दरम्यान आपण पुरावे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे न्यायालयाने निकाल आपल्या बाजूने दिला. दरम्यान आपण जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग यांना वेळोवेळी तक्रारी केल्या. मात्र त्यांनी दखल घेतली नाही. त्यामुळे आता आपण उच्च न्यायालयामध्ये धाव घेणार असल्याचे देखील लोंढे यांनी यावेळी सांगितले. सदर मद्य विक्रीचे दुकान हे बेकायदेशीरपणे आपली मालकी असलेल्या गाळा क्रमांक सहा मध्ये सुरू आहे. त्यामुळेच आपण या गाळ्यातील मद्यविक्रीचे दुकान बंद करण्यात यावे, अशी देखील मागणी केली आहे. मात्र त्याकडे देखील लक्ष दिले जात नाही. विशेषता आपण ज्यांना वापरासाठी गाळा दिला होता त्यांनी देखील आपला विश्वासघात केला असून त्यांच्या विरोधात आपण कठोर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

धुळ्यात रविवारी हॉस्पीकॉन कार्यशाळा

पॅनेल– परिसंवादाचा कार्यक्रम होईल.

**नूतन कार्यकारणी पदग्रहण**

आयएमएच्या धुळे शाखेच्या वतीने २०२४–२५ या वर्षासाठी नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा होणार आहे. त्यात नूतन अध्यक्ष डॉ.नारायण गलाणी, उपाध्यक्ष डॉ.मनिष जाखेटे, सचिव डॉ.रवींद्र सोनवणे, खजिनदार डॉ. चेतन पाटील व डॉ.कल्पेश बोरा व इतर नूतन पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण होईल.

**जीवन गौरव पुरस्कार**

आयएमएच्या धुळे शाखेच्या वतीने जेष्ठ धन्वंतरी डॉ.कृष्णमोहन सैंदाणे व डॉ.आशालता बाफना यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली. आयएमए सभासदांना उपस्थितीचे आवाहन आयएमएच्या धुळे शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

**कोटेशन**

एम.आय.डी.सी.मधील व्यंकटेश व्यापारी संकुलाच्या १००००० चौ.फुट बांधकामासाठी खालील कामासाठी ठेकेदार पाहिजे.

**इलेक्ट्रीक कामासाठी**

जवळपास २००० पॉइंटस् १० ॲम्पीयरचे
जवळपास ४०० पॉइंटस् ॲम्पीयरचे
जवळपास ७० मीटर फिटींग ४ ट्रान्सफार्मर
जवळपास ६० स्ट्रीट लाइटस्
मजुरी व मटेरियल्ससह वेगवेगळे दरपत्रक (कोटेशन) द्यावे.

* वरील कामाच्या निविदा, दरपत्रक (कोटेशन) शुक्रवार २६ एप्रिल २०२४ रोजी ६ वाजेपूर्वी खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात जमा करावी.
* निविदेसोबत मालाचा दर्जा, कंपनीचा स्पष्ट उल्लेख असावा.
* काम पूर्ण करण्याची मुदत नमूद करावी.

–: संपर्क :–
बंग एजन्सी
१२६८, गांधी पुतळ्याजवळ, आग्रारोड, धुळे

**विकत घेणे आहे**
धुळे शहरातील मुख्य एसटी बस स्थानकापासून १ कि.मी. अंतरावर घर, बखळ जागा किंवा प्लॉट त्वरित घेणे आहे.
–: संपर्क :–
9403422641

२० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..
**भक्ती नगर**
मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना
* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *
* सदर प्लॉटस्‌ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय.डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/– असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणुकीचा पर्याय.त्वरा करा!

–: संपर्क :–
श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे
ऑफिस :– २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे
9011765188, 9823412718, (02562) 240109

**ज्वारी व मका**
विना खर्च MIDC मध्ये खरेदी सुरु!
–: संपर्क :–
8975037887

**पाहिजेत**
ग्राफिक्स डिझायनर व बॅनर मशिन ऑपरेटींग साठी मुलगा पाहिजे. (कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक)
– संर्पक –
लक्ष डिजीटल प्रिंटर्स
गणेश सोनार
सुभाष पुतळा, औदुंबर मारुती मंदिर समोर गल्ली नं. ७, धुळे
8793182796 / 9764832896
02562358421

बाल विकास मंडळ, धुळे
शाखा
लायन्स नूतन विद्यामंदिर, धुळे
दि. २३/०४/२०२४ फोन नं. २३२३४६
**जाहीर निविदा (कोटेशन)**
नारायण बुवा समाधी मधील आमच्या संस्थेच्या शाळेतील खालील दुरुस्तीसाठी निविदा आमंत्रित करीत आहोत.
१) – ५ खोल्यांचे पत्रे बदलणे. २) – ५ खोल्यांची डागडुजी करणे.
३) – ५ खोल्यांच्या दरवाजे, खिडक्यांची दुरुस्ती करणे.
४) – शाळेला आतून बाहेरुन रंग मारणे.
५) – १०० बेंच (KG/1st साठी) ६) – ब्लॅक बोर्ड ५ नग
☛ निविदा लेखी स्वरुपात २९ एप्रिल २०२४ पर्यंत देणे.
☛ काम २३ एप्रिल ते २७ एप्रिल २०२४ पर्यंत सकाळी १० ते १२ या वेळेत पाहता येईल. –: संपर्क :–
तर्फे अध्यक्षा,
बाल विकास मंडळ, संचलित
लायन्स नूतन विद्यामंदिर, नारायण बुवा समाधी, गांधीपुतळ्याजवळ, धुळे.

**उठावना**
बड़े दुख के आपको सूचित किया जाता है की स्व.भटूलाल नथमल अग्रवाल इनकी बडी बहन तथा विजय, अजय इनकी भुवाजी जालना निवासी श्रीमती रुक्मिणीबाई कृपाशंकरजी भारुका इनका दु:खद निधन हो गया है। ईश्वर ईच्छा । उनका उठावणा आज गुरूवार, दि.२५–०४–२०२४ को दोपहर ४ बजे
स्थान– अग्रवाल भवन, उसगल्ली, धुलीया यहापर है।
–: शोकाकुल :–
बाबूलाल ओंकारमल अग्रवाल विजय भटुलाल अग्रवाल
अजय भटुलाल अग्रवाल एवम समस्त जिंदल परिवार
फर्म : मे.भटुलाल नथमल अग्रवाल

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटींगसाठी मुली लावणे आहेत. Tally, MS-CIT चे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा!
कंचन डिस्ट्रीब्युटर्स
तारगल्ली, सराफ बाजार, राम देवबाबा मंदिराजवळ,धुळे

**पाहिजेत**
लॉजिंग कामासाठी वेटर पाहिजे. समक्ष भेटा!
सुयोग लॉज
संकल्प दातांच्या दवाखान्या शेजारी, दसेरा मैदान समोर, मालेगावरोड, धुळे

**रो हाऊस विकणे आहे**
बिलाडी रोड, मानव केंद्रामागे रो–हाऊस विकणे आहे. सर्व सोयीयुक्त
–: संपर्क :–
9860334363

**प्लॉट विकणे आहे**
माहेश्वरी सोसायटी सर्व्हे नं.९१, प्लॉट नं.२४, साईबाबा मंगल कार्यालयाचे पुढे, नकाणेरोड, देवपूर, धुळे. प्लॉट–८५० स्के.फुट योग्य भाव मिळाल्यास त्वरित विकणे आहे.
संपर्क : रमेश साळवे
7066559455

**पाहिजेत**
BAMS / BHMS DOCTORS
MBA MARKETING
FOR HEALTH OK START UP AT.. DHULE, JALGAO, NASHIK
-: CONTACT :-
7588517991

**पाहिजेत**
१) रेडिमेड कापड दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे.
२) टेलर कामासाठी पूर्ण वेळ टेलर पाहिजे.
प्रत्यक्ष भेटा.
महावीर ड्रेसेस
आग्रारोड, फुलवाला चौक, धुळे




**पाहिजेत**
कापड दुकानामध्ये कामा करिता माल जोडणे, गिऱ्हाईक करणेसाठी मुले/मुली अनुभवी असलेले त्वरित लावणे आहेत.
राकेश कापड दुकान
जे.बी.रोड, धुळे

**पाहिजेत**
ऑफिस कामासाठी मुले – २
ऑफिस कामासाठी ड्रायव्हर (फोर व्हीलर)–१
कॉम्प्युटर ऑपरेटर व ऑफिस रिसेप्शनिस्ट मुलगी–१
अनुभवास प्राधान्य. भेटण्याची वेळ : दु.४ ते ६ (अनुभव ३ वर्ष) समक्ष भेट आवश्यक !
सोबत येताना kyc Document व बायोडाटा आणणे.
श्रीनाथ कार मॉल, हॉटेल फायफाय समोर, बालाजी मंगल कार्यालयाजवळ, चाळीसगावरोड, धुळे

**पाहिजेत**
कामासाठी मुले पाहिजेत.
सेल्समन – २
हेल्पर – २
स्वर्ण पॅलेस ज्वेलर्स
आग्रारोड, सराफबाजार धुळे
232428 - 233991

**पाहिजेत**
रिकवरी बॉय- 2
12वी पास, दुचाकी आवश्यक
डिझाईनर/डीटीपी ऑपरेटर- 2
कोरल-फोटोशॉप, मराठी टायपिंग.
आफिस बॉय- 1
10वी पास, सायकल आवश्यक.
अर्जासह भेटा सकाळी ११ ते संध्या. ७ पर्यंत
एके मीडिया
पहिला मजला, सत्यम आर्केड, पतंजलीसमोर, नगरपट्टी, धुळे. मो.: 98811 36034

**पाहिजेत**
MS Excel ची माहिती असलेला वेअर हाऊस कामासाठी मुलगा पाहिजे.
सिद्धी विनायक ऑटोमोटीव्ह
9822297970

**पाहिजेत**
एजन्सी कामासाठी पार्टटाईम/फुलटाईम मनुष्य पाहिजे. समक्ष भेटणे!
किसान केंद्र
१२१०, नगरपट्टी, धुळे
236729

**पाहिजेत**
टेली ऑपरेटर–२
Exal आले पाहिजे.
सेल्समन– ३
श्री सिद्धी विनायक एजन्सी
राजकमल टॉकीज मागे, ऊस गल्ली, ग.नं.४, धुळे
8888887161

**बंगला भाड्याने देणे**
चार बेडरुम, प्रशस्त हॉल, किचन, गॅलरी, पार्किंग, २४ तास पाणी इत्यादी सर्व सोयींनी युक्त बंगला भाड्याने देणे आहे.
–: संपर्क :–
8208879381

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–४००४११५, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०